| | महाराष्ट्र शासन<br>शालेय शिक्षण व क्रीडा विभाग<br>**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र** | |
|---|---|---|
| Email:<br>jeevanshikshan@maa.ac.in | ७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे- ४११०३० | Tel:<br>020-24476938 |

जा.क्र. राशैसंवप्रपम/प्रमा/परीक्षण शुल्क वाढ/२०२५-२६/02५८८ दि.28/08/२०२५

प्रति,

मा.प्रधान सचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, मुंबई.

विषय : खाजगी निर्मात्यांनी तयार केलेल्या शैक्षणिक साहित्य/ई-साहित्य/शैक्षणिक चित्रपट/लघुचित्रपट, शैक्षणिक साहित्य संच, पोस्टर्स व अभ्यासक्रम विषयक पुस्तके आणि अवांतर वाचनासाठीची पुस्तके इत्यादी साहित्याचे परीक्षण शुल्क दरवाढीच्या परिपत्रकाबाबत...

संदर्भ : १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र. २५ दि. ५ मार्च २०२०
२.जा.क्र.राशैसंवप्रपम/प्रमा/परीक्षण सुधारित दर/२०२२-२३/१०७४ दि.०२/०३/२०२३

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये खाजगी निर्मात्यांनी तयार केलेल्या शैक्षणिक साहित्य/ई-साहित्य/शैक्षणिक चित्रपट/लघुचित्रपट, शैक्षणिक साहित्य संच, पोस्टर्स व अभ्यासक्रम विषयक पुस्तके आणि अवांतर वाचनासाठीची पुस्तके इत्यादी साहित्य तपासणीसाठीच्या शुल्कामध्ये दर दोन वर्षांनी १० टक्क्यानी वाढ करण्याचा अधिकार मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांना देण्यात आला आहे. संदर्भ क्र.२ नुसार साहित्य तपासणी शुल्कमध्ये दरवाढ दि.०२/०३/२०२३ रोजी करण्यात आली होती. सबब सदर परिपत्रकास २ वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला आहे. तथापि सदर साहित्यांचे परीक्षण करण्यासाठी संबंधित तज्ज्ञांना अमंत्रित करून कार्यशाळेंचे आयोजन करावे लागते. या दरमान्य तज्ञांचे मानधन, भोजन-नाष्टा, चहा, निवास, स्टेशनरी व अनुषंगिक खर्च भागविण्यासाठी १० टक्क्यांनी पुढीलप्रमाणे वाढ करण्यात येत आहे.

साहित्यांचे परीक्षण करण्यासाठीचा शुल्क तपशील पुढीलप्रमाणे

Scanned with OKEN Scanner

अ) छापील साहित्य -

(अवांतर वाचन पुस्तके, अभ्यासक्रम विषयक पुस्तके, शब्दकोष व अन्य पूरक पुस्तके)

| अ .क्र | पृष्ठ संख्या | जूने तपासणी दर (दि.०२/०३/२०२३ नुसार) | नवीन तपासणी दर (१०% वाढ नुसार) | द्वितीय तपासणी दर (योग्य साहित्य वगळून) |
|---|---|---|---|---|
| १. | १ ते २० पृष्ठे | ५५०/- | ६०५/- | ६०५/- |
| २. | २१ ते ५० पृष्ठे | १,६५०/- | १,८१५/- | १,८१५/- |
| ३. | ५१ ते १०० पृष्ठे | २,२००/- | २,४२०/- | २,४२०/- |
| ४. | १०० ते २०० पृष्ठे | २,७५०/- | ३,०२५ | ३,०२५ |
| ५. | २०० पृष्ठ संख्येच्या पुढे | रु.२०/- (Back to Back) | रु.२२/- (Back to Back) | रु.२२/- (Back to Back) |

ब) ई- साहित्य - (Online स्वरूपात)

| अ. क्र | साहित्य प्रकार | जूने तपासणी दर १ जी.बी पर्यंत (दि.०२/०३/२०२३ नुसार) | नवीन तपासणी दर १ जी.बी पर्यंत (१०% वाढ नुसार) | जूने तपासणी दर १ जी.बी च्या पुढे प्रत्येक जी.बी. साठी (दि.०२/०३/२०२३ नुसार) | नवीन तपासणी दर १ जी.बी च्या पुढे प्रत्येक जी.बी साठी (१०% वाढ नुसार) |
|---|---|---|---|---|---|
| १. | ऑडीओ डीव्हीडी | २,२००/- | २,४२०/- | प्रत्येक जी.बी साठी रु.२,२००/- | २,४२०/- |
| २. | व्हिडीओ, खेळ / प्रश्नसंच इ. | ५,५००/- | ६,०५०/- | प्रत्येक जी.बी साठी रु.५,५००/- | ६,०५०/- |

क) शैक्षणिक चित्रपट / लघुचित्रपट –

| अ. क्र | कालावधी | जूने तपासणी दर (दि.०२/०३/२०२३ नुसार) | नवीन तपासणी दर (१०% वाढ नुसार) |
|---|---|---|---|
| १. | १ तासापर्यंत | ११,०००/- | १२,१००/- |
| २. | १ ते २ तास | १६,५००/- | १८,१५०/- |
| ३. | २ तासांच्या पुढे | २७,५००/- | ३०,२५०/- |

Scanned with OKEN Scanner

ड) शैक्षणिक साहित्य संच/कार्ड/पोस्टर्स/खेळ

| अ. क्र | वस्तू | जूने तपासणी दर (दि.०२/०३/२०२३ नुसार) | नवीन तपासणी दर (१०% वाढ नुसार) |
|---|---|---|---|
| १. | १ ते १० वस्तू | २,२००/- | २,४२०/- |
| २. | १ ते २० वस्तू | ३,३००/- | ३,६३०/- |
| ३. | १ ते ३० वस्तू | ५,५००/- | ६,०५०/- |
| ४. | ५० वस्तू पर्यंत | ११,०००/- | १२,१००/- |
| ५. | ५१ व पुढील प्रत्येकी १० वस्तूसाठी | - | २,४२०/- |

उपरोक्त सर्व साहित्यांच्या पुनर्परीक्षणाबाबत जेवढ्या साहित्यामध्ये दुरूस्ती सुचविण्यात आल्या आहेत तेवढ्या साहित्यांची परिगणना करून उपरोक्त दराप्रमाणे शुल्क आकारण्यात येतील.

शैक्षणिक साहित्य/ई-साहित्य/शैक्षणिक चित्रपट/लघुचित्रपट, शैक्षणिक साहित्य संच, पोस्टर्स व अभ्यासक्रम विषयक पुस्तके आणि अवांतर वाचनासाठीची पुस्तके इत्यादी साहित्याचे परीक्षण शुल्क दरवाढ करण्यात आलेले आहे. सदर दरवाढ या आदेशाच्या दिनांकापासून लागू राहील. तरी सदरची परीक्षण शुल्कवाढ करणेबाबतचे परिपत्रक आपल्या अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

29/04/25

(राहूल रेखावार भा.प्र.से.)
संचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे

सोबत : शुल्क दरवाढीचे परिपत्रक

Scanned with OKEN Scanner